<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक २४०/२०१४</u>

<u>निशाणी १२ वरील आदेश</u>

१. अर्ज व त्यावरील म्हणणे नि. १४ वाचले.

२. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुतचा दावा हा कब्जेसाठी दाखल केला असून वादीने दाव्याची आकारणी रक्क्म रुपये ६८,०००/– इतकी केली असून त्यावर एकत्रीत रक्क्म रुपये ५,५३०/– चा मुद्रांक दिलेला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीनी मागीतलेल्या वेगवेगळया दादींची वेगवेगळी आकारणी करुन त्यावर मुद्रांक देणे आवश्यक आहे. परंतु वादीने तसे न केल्याने दिवाणी प्रक्रीया संहीता क्रम ७ नियम ११ प्रमाणे दावा reject करणे बाबत विनंती केलेली आहे.

२. वादींनी म्हणणे देवून अर्जातील कथने नाकरली आहेत.

३. सदर अर्ज निकाली काढणे पुर्वी तसेच अर्जाचा गुणदोषावर निकाल होणेसाठी प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादीने दावेची आकारणीवरती कमी मुद्रांक दिला आहे किंवा काय याबाबात चौकशी करणे आवश्यक आहे. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे–

सहायक अधिक्षक – १ यांनी सदर अर्जातील कथना प्रमाणे चौकशी करुन आपला अहवाल पुढील तारखे पर्यंत सादर करावा.

सही/–

दिनांकः १३/१०/२०१६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
कुरुंदवाड